2017 2018

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol II 10th February 2018

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

ISSN : 2319 – 8648 **CURRENT GLOBAL REVIEWER**
Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue 1, Vol II, 10th Feb. 2018

# "जागतिकीकरण आणि भारत"

**श्री.फरताडे एस.बी**
इतिहास विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई
**डॉ.बी.डी.जाधवर**
इतिहास विभाग प्रमुख, बलभिम महाविद्यालय बीड

---------------(04)---------------

**प्रस्तावना :-**

२४ जुलै १९९१ हा दिवस भारताच्या स्वातंत्र्योत्तर आर्थिक इतिहासात आर्थिक सुधारणांची मुहुर्तमेढ रोवणारा दिवस ठरला. कारण या दिवशी तत्कालीन अर्थमंत्री डॉ.मनमोहनसिंग यांनी आपल्या पहिल्या अर्थसंकल्पात धोरणात्मक बदल केले. या आर्थिक सुधारणा पर्वातुनच जागतिकीकरण उदारीकरण- खाजगीकरण (खाऊजा) धोरणाचा एक देशव्यापी भंग बनला. या धोरणाच्या माध्यमातून अधिक खुली अर्थव्यवस्था, खाजगी क्षेत्राचा सर्वव्यापी सहभाग, खाजगी गुंतवणुकीला प्राधान्य, विदेशी गुंतवणुकीला आकर्षित करणे, स्पर्धातमक व गुणात्मक सेवेला प्राधान्य देण्यात आले. जागतिकीकरणाने आज आपल्याला पुर्णतः व्यापून टाकले असून विश्व एक बाजारपेठ बनले आहे. पंधराव्या-सोळाव्या शतकातील युरोपमधील आधुनिक भांडवली उत्पादन संबधाचा उगम, वसाहतवाद, साम्राज्यवाद व प्रगत चंगळवादी जीवनशैली मुळे आपण जागतिकीकरणाच्या प्रवाहात कळत नकळ सामील झालो आहोत. जागतिक व्यापार-व्यवहार ही गोष्ठ नविन नाही यास प्राचीन इतिहास आहे. परंतु डकेल प्रस्तावानंतर जागतिक व्यापाराचे स्वरुप बदलले आहे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया जवळपास सोळा वर्षापासून सुरु आहे. नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीला भारतात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. तेव्हा भारताची आर्थिक परिस्थिती चिंताजनक होती. परकीय चलन दोन आठवडे पुरेल एवढेच होते. यामुळे भारतास जागतिकीकरणाचे धोरण स्विकारावे लागले.

**जागतिकीकरण :-**

स्थानिक वस्तु, माहिती, तंत्रज्ञान, गुंतवणुक भांडवल याची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया म्हणजे जागतिकिकरण होय. प्रत्येक राष्ट्र जागतिकिकरणाचा विविध बाजूने अर्थ स्पष्ट करतात. "जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण जगाची एका मोठया बाजारपेठेत रुपांतरीत होण्याची प्रक्रिया होय." वस्तु, सेवा, भांडवल व श्रम यांच्या व्यापारावरील निर्बध उठवून जागतिक स्तरावर व्यापार मुक्तपणे घडून येण्याची प्रक्रिया यात समाविष्ठ होते. थॉमस फ्रीडमन च्या मते, 'जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त आणि माहितीच्या एकत्रीकरणातून एकच अशी जागतिक बाजारपेठ आणि संस्कृतीची निर्मिती होय. भारताच्या बाबतीत जागतिकीकरण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थांचे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मीकरण करणे होय.' जागतिकिरणाच्या माध्यमातून भौगोलिकता व राष्ट्रीय ओळख नष्ठ होऊन इतिहास आणि राजकारणाचा पुर्नजन्म होतांना जागतिक आणि कृति राष्ट्रीय म्हणजेच ग्लोबल टु लोकल याला सर्व क्षेत्रातून प्राधान्य दिले जात आहे. जागतिकीकरणाच्या बाजारपेठा, व्यापार, वित्तीय गुंतवणूक, आर्थिक धोरणे, कृषी, रोजगार, मानव संसाधन यावर प्रभाव पडतांना दिसून येतो.

**जागतिकीकरणाचे भारताला होणारे फायदे :-**

जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारताला होणारे फायदे पुढील प्रमाणे आहे.

**१. जागतिक बाजारपेठेची निर्मिती-**

जागतिकीरणामुळे बाजारावर असणाऱ्या भौगोलिक सीमांचे बंधन कमी होईल. जग हे एकच बाजारपेठ होईल. वस्तूंना असलेली मागणी वाढेल. त्यामुळे निर्यातीत वाढ होऊन परकिय चलनाचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल तसेच बाजारपेठेची गुणवत्ता व दर्जा ही उंचावेल.

**२. मुक्त व्यापार-**

जागतिकीकरणाचा मुख्य उद्देश आहे जगात मुक्त व्यापार सुरु करणे. आंतरराष्ट्रीय व्यापारावर पुर्वी असलेले निर्बंध कमी होतील त्यामुळे आयात-निर्यात नियंत्रणमुक्त होईल. लोकांना कमी किंमतीत चांगल्या प्रतीच्या वसतू मिळतील.

ISSN : 2319 – 8648 CURRENT GLOBAL REVIEWER
Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

**३. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा वाढेल-**

जागतिकीकरणामुळे देशातील उद्योगांना केवळ देशांतर्गतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी तोंड द्यावे लागेल. त्यासाठी त चांगल्या प्रतीच्या वस्तू तयार करण्याचा प्रयत्न करतील. उत्पादन प्रक्रियेत सुधारणा करून किंमत कमी करण्याचा प्रयत्नही त्यांना करावा लागेल. परिणामतः उद्योगाची कार्यक्षमता व उत्पादकताही वाढेल.

**४. तुलनात्मकदृष्ट्या फायदेशीर उद्योगाचा विकास-**

नैसर्गिक साधनसंपत्ती सर्व देशात सारख्याच प्रमाणात उपलब्ध नसते. काही देशांना काही वस्तूंच्या उत्पादनात तुलनात्मक दृष्ट्या फायदा असतो. भारत वस्त्रोद्योग, सोने चांदीचे दागिने, लेदर, या फलवार, चित्रपट निर्मिती काही इंजिनियरींग वस्तू यांना अशा उद्योगांच्या विकासाला चालना मिळेल.

**५. सुधारणांना प्राधान्य-**

जागतिकीकरणाच्या माध्यमातून शासन-प्रशासन अर्थव्यवस्था, उद्योग या क्षेत्रात नवनविन व्यवस्थापन तत्व व तंत्रांचा अवलंब करण्याच्या दृष्टीने सुधारणांना प्राधान्य दिले जाईल.

**जागतिकीकरणाचे परिणाम-**

भारताने जागतिकीकरणाच्या दिशेने १९९१ च्या नविन आर्थिक धोरणापासून वाटचाल सुरु केली. त्याचे भारताच्या त्याचे भारतीय आयात-निर्यात, रोजगार निर्मीती, कल्याणकारी राज्याची भूमिका, श्रम बाजार या क्षेत्रावर प्रतिकुल परिणाम पहावयास मिळतात ते पुढील प्रमाणेक आहेत.

**१. सामाजिक कल्याणाकडे दुर्लक्ष-**

जर परकीय गुंतवणूक मूलभूत क्षेत्रात झाली तर सामाजिक कल्याणाकडे दुर्लक्ष होईल. उदा. विमा क्षेत्र, रस्ते, वाहतुक वगै कारण त्यांचा हेतू या देशातील लोकांचे मुलभूत गरजा भागविणे हा नसेल तर केवळ नफा कमविणे हाच असेल. नफा कमविण्यासाठी त वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करतील. कमी किंमतीला वस्तु किंवा सेवा पुरविण्यात कोणताही रस असणार नाही.

**२. सांस्कृतिक परिणाम-**

जागतिकीकरणाचे परिणाम हे केवळ आर्थिक स्वरुपाचे असतील असे नाही. तर अनार्थिक स्वरुपाचे सुध्दा असतील जागतिकीकरणाचे सांस्कृतिक परिणाम सुध्दा होतील. लोकांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलेल. जीवन जगण्याची पध्दत बदलेल नैतिक मुल्यांचा ऱ्हास होईल. त्यागवादी संस्कृतीचे भोगवादी संस्कृतीत रुपांतर होईल. पैशावर आधारीत व्यवस्था येईल. प्रत्येक क्षेत्राती यशस्वीता पैशात मोजली जाईल. व्यक्तीचे गुणदोष पैशातच मोजले जातील. पैसा लोक कोणत्याही मार्गाने कमविण्याचा प्रयत्न करतील पैसा कमविण्यासाठी अनेक वाईट सवई समाजात वाढीस लागतील. नैतिक अध:पतन होईल.

**३. शैध्दीक संपदेचे वहन (Brain Drain)-**

ची समस्या गंभीर होईल- भारतात ही समस्या अगोदरच आहे. येथील उच्च शिक्षीत लोक विकसीत देशात नोकऱ्या कर पसंत करतात कारण त्यांना मिळणाऱ्या पगारी व इतर सोयी आणि नोकरीतील समाधान या गोष्टी विकसीत देशात व विकसनशी देशात अगदी भिन्न आहेत. नौकरीतील राजकीय हस्तक्षेप व उच्चशिक्षीत लोकांची होणारी कुचंबना टाळण्यासाठी हे लोक बहुराष्ट्री कंपन्यात जाणे पसंत करतील. उदा.भारतातील चांगल्या संस्थेतून MBA केलेले विद्यार्थी बहुराष्ट्रीय कंपन्यातील नौकरी पसंत करता पण जपानमधील MBA धारक जपानीज कंपनी पसंत करतात. यातून Brain Drain ची समस्या गंभी होईल. देशातील बुध्दीमत्ते फायदा देशाला होण्याऐवजी बहुराष्ट्रीय कंपन्यांना होईल.

**४. लहान उद्योग आजारी होतील किंवा बंद पडतील-**

जागतिकीकरणाचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे लहान उद्योग, मध्यम उद्योग बंद होतील. कारण असे उद्योग बहुराष्ट्र कंपन्यांकडून होणाऱ्या स्पर्धेला तोंड देऊ शकणार नाहीत. कारण त्यांचा उत्पादन खर्च जास्त असतो. परिणामतः किंमत त्यांना जा आकारावी लागते. त्यांच्या वस्तूंची गुणवत्ता ही मोठ्या उद्योगातील वस्तूच्या गुणवत्तेसारखी नसते. परिणामी बंद होतील.

**५. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे राजकीय वर्चस्व-** बहुराष्ट्रीय कंपन्यांचे राजकीय वर्चस्व निर्माण होईल त्या देशांच्या राजकारण हस्तक्षेप करतील किंबहुना महत्वाची भुमिका बजावतील त्यांना हवा तो पंतप्रधान, राष्ट्रपती बनविण्यासाठी प्रयत्न करतील. हव्या त

पक्षाचे सरकार आणण्यासाठी प्रयत्न करतील. त्याचे हितसंबंध जोपासणाऱ्या पक्षांच्या पाठीशी राहतील. एखादा पक्ष किंवा सरकार त्यांच्या हितसंबंधात अडचणी निर्माण करतो आहे किंवा हितसंबंधाच्या विरोधात जात आहे असे वाटलयास त्या सरकारच्या विरोधात कार्य करतील. त्यासाठी परत समाजात अराजकता माजविणे, दंगे घडवून आणणे अशा गोष्टी सुध्दा करतील याची शक्ता नाकारता येत नाही. हितसंबंध जपणारा पक्षच सत्तेवर राहू शकेल. कदाचित बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जोरावर राज्य करण्याची महत्वकांक्षा बाळगणारे बरेचसे नेते मंडळी या देशात आहेत. देशाचे हितसंबंध काही वेळा बाजुला ठेवून अशी फितूर मंडळी या कंपन्याचे हितसंबंध जोपासतील.

**६. बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून देशाची लुट-**

या धोरणामुळे विकसीत देशाची मोठेमोठे उद्योग विकसनशील देशात येतील. या देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा ते वापर करतील व त्याच देशातील बाजारपेठेत वस्तू विकतील. म्हणजेच थोडक्यात नैसर्गिक साधनसंपत्तीचा उदा. कच्चा माल, मनुष्यबळ वगैरे विकसनशील देशाचे बाजारपेठ याच देशांची आणि नफा मात्र बहुराष्ट्र कंपन्यांचा अशी परिस्थिती निर्माण होईल. आताचा साम्राज्यवाद पूर्णपणे वेगळा असेल अशा मोठमोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना सहजासहजी हाकलने आवघड असेल.

**७. बेकारीची समस्याय निर्माण होईल-**

बहुराष्ट्रीय कंपन्या बेकारीची समस्या आणखी गंभीर करतील. कारण त्या एक तर विकसनशील देशात फक्त वस्तु पाठवतील. स्वतः चे उत्पादन आपल्याच देशात करतील. कारण त्यांचा हेतू फक्त बाजारपेठ काबीज करणे हाच आहे. त्यांना रोजगार निर्मितीत कोणताही रस नाही. उदा. कोरीया, जपान, चिनमधून आपल्या देशाला अनेक वस्तू येत आहेत. त्यामुळे त्या वस्तू तयार करणारे देशातील कारखाने हळूहळू बंद होतील. त्यामुळे लाखो लोक बेकारीच्या खाईत लोटले जातील. तसेच शेतीत तयार होणाऱ्याही वस्तू जागतिकीकरणामुळे स्वस्त उपलब्ध होतील. त्यामुळे देशातील शेतीमालाची बाजारपेठ हळूहळू कमी होईल. शेती करणाऱ्यांचे प्रचंड नुकसान होईल. शेती करणेही अवघड होईल. शेतीतील रोजगार संधी कमी होतील. जरी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकसनशील देशात गुंतवणूक केली तरी ते कामगार कामावर लावणार नाहीत. कारण विकसनशील देशातील कामगारांची कार्यक्षमता अतिशय कमी असते. शिवाय त्यांच्याकडे हवे ते कौशल्य नसते. तसेच कामगार संघटनेच्या माध्यमातून ते त्रास देतील या भीतीने ते उत्पादन प्रक्रियेचे यांत्रिकीकरण करतील. कॉम्प्युटर सारखी आधुनिक तंत्र वापरतील. परिणामी रोजगार संधी निर्माण होणार नाहीत. उलट आहे त्या रोजगार संधी पण कमी होतील.

थोडक्यात जागतिकीकरणाचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम सर्व क्षेत्रावर व सर्व राष्ट्रांवर होतांना पहावयास मिळते. जागतिकीकरणाच्या माध्यमातून नोकर कपात, उद्योग इतर देशाकडे जातील, गरीब-श्रीमंत दरी वाढणे, व्यावसायीक मक्तेदारी यासारखे प्रश्न भारतासमोर होते ते प्रगत देशांनाही भेडसावू लागले आहेत. कल्याणकारी राज्याचा ऱ्हास होतो. भारताने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस मानवी चेहरा देवून सर्व समावेशक धोरणाच्या माध्यमातून भारतीयांचे हित जोपासणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जागतिकीकरणामुळेच इंग्रजी शिक्षण व माहिती तंत्रज्ञानामुळे भवितव्य घडू शकते. हे सर्व नागरिकांना समजले आहे.

**संदर्भ सुची :**

१. Datt Rudar and sundaram (२००६) Indian Economy, ५४th ed. S.chand and campany Ltd. New Delhi.
२. Saksena K.D. (२००६) Economic Reforms- The Indian Experience- Shipra Publication Delhi.
३. दै.लोकसत्ता- २५ जानेवारी २०१६.
४. मिश्रा व पुरी भारतीय अर्थ व्यवस्था.